# जनमत सर्वसामान्यांचे



## राष्ट्रमाता इंदिरा कन्या प्रशालेत सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा उपक्रम

मोहोळ, दि.८ (प्रतिनिधी) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या संगणकशास्त्र संकुल व क्वीक हिल फाउंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रमाता इंदिरा कन्या प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय मोहोळ येथे सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमांतर्गत विद्यापीठाच्या संगणकशास्त्र संकुलाच्या ऋतुजा वाघमोडे व रत्नप्रभा चंदनशिवे या विद्यार्थिनींनी विद्यार्थ्यांचे समुपदेशन केले. आजच्या ऑनलाईन युगात होणाऱ्या विविध फसवणुकीपासून आपण सावध कसे राहावे. ऑनलाईन व्यवहारामध्ये फसवणूक कशी केली जाते. आपली फसवणूक होऊ नये म्हणून आपण काय काळजी घ्यावी याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना यावेळी त्यांनी योग्य उत्तरे दिली. ओ टी पी कोणाला सांगू नये ,अनोळखी नंबर वरून आलेल्या फोन कॉल्सची पडताळणी करणे, वाटसअप व इतर सोशल मीडियावरून आलेले मेसेजेस व लिंक ची शहानिशा करावी व त्यानंतरच पुढील प्रक्रिया करावी. पासवर्ड स्ट्रॅंग कसा बनवावा व आपली वैयक्तिक माहिती कशी सुरक्षित ठेवावी. आपली जबाबदारी काय आहे याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. मोबाईल, कॉम्प्युटर, लॅपटॉप या साधनासाठी अँटीव्हायरसचा वापर करण्याविषयी सूचना त्यांनी दिली. कार्यक्रमास प्रशालेतील ५०० विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशालेचे मुख्याध्यापक सुधीर गायकवाड, पर्यवेक्षिका विजयश्री गायकवाड, गुरुनाथ मुचांडे सुभाष बुरंगे, नाना ताकमोगे, मोहन व्यवहारे, संदीप निस्ताने यांचे मार्गदर्शन लाभले. बापू दळवे यांनी उपस्थितांचे आभार मानले.